विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

व्यक्तित्व कर्तृत्व व विचार

प्रा. श. श्री. पुराणिक

माझे
दिवंगत
परमस्नेही
कै. दत्तात्रय महादेव गद्रे
यांस

विषयानुक्रमणिका

राजवाडे यांचा जन्म, बालपण, शिक्षण / पृष्ठे १ ते २२
लग्न, नोकरी, इतिहास संशोधनाचा प्रारंभ / पृष्ठे २२ ते ३१
प्रतिकूल परिस्थिती, संशोधनातील अनुभव / पृष्ठे ३१ ते ४६
राजवाडे यांची इतिहासमीमांसा / पृष्ठे ४६ ते ५६
इतिहास न लिहिणारा इतिहासकार / पृष्ठे ५६ ते ६८
भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास / पृष्ठे ६८ ते ८३
राजवाडे यांचे वैयक्तिक जीवन / पृष्ठे ८३ ते ११४
द्रष्टेपणा, उपद्रवी स्वभाव, मित्रऋण / पृष्ठे ११४ ते १४२
राजवाडे यांनी काढलेली विविध मंडळे / पृष्ठे १४२ ते १६२
राजवाड्यांची अनेक रूपे / पृष्ठे १६२ ते १८८
शारदोपासक संमेलन–भाषण / पृष्ठे १८८ ते २०३
धातुकोशाचे काम, आकस्मिक मृत्यु / पृष्ठे २०३ ते २२१
राजवाड्यांची मरणोत्तर उपेक्षा / पृष्ठे २२१ ते २६९

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

(व्यक्तित्व. कर्तृत्व व विचार)

प्रा. श. श्री. पुराणिक

रविराज प्रकाशन / पुणे ३०

पहिली आवृत्ती
ऑगस्ट १९८९

प्रकाशक
रवि वेहेरे
रविराज प्रकाशन
४५८।२ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

©
प्रा. श. श्री. पुराणिक

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

प्रकाशन क्रमांक / ९०

मुद्रक
रवि वेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ
पुणे ४११ ००२

मूल्य
पासष्ठ रुपये

राजवाडे यांच्या वडिलांचा चुलता पेशवाईच्या पडत्या काळात लोहगडचा किल्लेदार होता. पण पेशवाई मावळली आणि पेशवाई-बरोबर किल्लेदारीचे वैभवही मावळले. जिकडे–तिकडे इंग्रजी राज्य झाले आणि राजवाडे मंडळींना साहेबांच्या राज्यात शोभतील आणि पचतील असे धंदे करण्याची वेळ आली. राजवाडे यांचे वडील काशिनाथपंत हे पुण्याला वकिली करू लागले. आणि त्यांचे बंधू जगन्नाथ बापूजी राजवाडे हे पुणे जिल्ह्यात वडगावी मराठी वकील झाले. राजवाडे यांच्या आईचे नाव यमुनाबाई. तिचे माहेर कोकणात वरसई येथे होते. वरसईला राजवाडे यांचा जन्म आषाढ शुद्ध अष्टमी शके १७८५, २४ जून १८६३ रोजी दुपारी बारा वाजता झाला. त्यांना एक मोठा भाऊ होता- त्याचे नाव वैजनाथ. तो राजवाडे यांच्यापेक्षा चार वर्षांनी मोठा होता.

पित्याचे छत्र राजवाडे यांना फार दिवस लाभले नाही. ते लहान असतानाच, त्यांच्या चवथ्या वर्षी त्यांचे वडील वारले, घरात कर्ता आणि मिळवता माणूस तोच. तोच गेल्यामुळे त्या कुटुंबावर मोठाच कहर गुदरला. वादळ सुरू व्हावे आणि घरावरचे छप्पर उडून जावे तसे झाले. काही दिवस त्यांची आई दोन मुलांना घेऊन माहेरी वडिलांकडे जाऊन राहिली, काही दिवस वडगावला तिने दिराकडे काढले. पण असे फार दिवस चालणे कठीण होते. मुलांच्या शिक्षणाचे काही पाहणे जरूर होते. म्हणून ती अखेरी पुण्याला फुटक्या बुरुजाजवळ जोगळेकरांच्या वाड्यात येऊन राहिली. त्यावेळी त्यांची स्थिती चांगली नव्हती. राजवाडे यांचे स्नेही मिरजेचे गोगटे मास्तर एकदा त्यांच्याकडे त्या दिवसात गेले होते. ते म्हणतात, त्यांची घरची स्थिती चांगली नव्हती. दोघे बंधु विश्वनाथ व वैजनाथ एका खोलीत वाचीत

बसले होते. वैजनाथपंतांच्या एका आरामखुर्चीशिवाय दुसरे काहीएक सामानसुमान त्या खोलीत नव्हते. जोगळेकरांच्या वाड्यातली बिऱ्हाडाची जागा व सामानसुमान यावरून त्यांच्या गृहपरिस्थितीची कल्पना येईल. परंतु दारिद्र्य जरी असले तरी स्वस्ताई कमालीची होती आणि काशिनाथपंत जरी फार श्रीमंत वकील नसले तरी वकिलीत त्यांनी थोडीफार माया केली होती, त्यामुळे या संचित धनावर त्या सुवत्तेच्या काळात थोडीथोडकी नव्हे तर वीस वर्षे त्यांच्या आईने निभावून नेली. १८८७ साली, मोठे चिरंजीव वैजनाथपंत यांना कराचीच्या कॉलेजात प्रोफेसरची नोकरी मिळाली आणि या कुटुंबाची दारिद्र्यातून एकदाची सुटका झाली. ते शिकत असतानाही त्यांचा भार कुटुंबाला असा फारसा नव्हताच. त्यांना शाळेत बक्षिसे मिळत, फीची सवलत मिळे आणि डेक्कन कॉलेजात तर त्यांना स्कॉलरशिपच मिळत होती. त्या काळात डेक्कन कॉलेजात सारा खर्च दरमाणशी दरमहा किती येत असेल म्हणाल, तर फक्त आठ रुपये !

राजवाडे लहानपणी अतिशय तेजस्वी व सुरेख दिसत. ते वर्णाने गोरेपान होते आणि वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत आईच्या अंगावर पोसले गेल्यामुळे ते चांगले भरदार दिसत. त्यांच्या आईचे व आजीचे त्यांच्यावर फार प्रेम होते. त्यात काही विशेष नाही. पण शेजारपाजारची माणसेसुद्धा त्यांची मुखश्री पाहून मोठी प्रसन्न होत आणि म्हणत की, 'हा कुटुंबाचे साकडे फेडील.' मनुष्याचा चेहरा हेच त्याचे शिफारसपत्र. वडील वारल्यामुळे बापाचा धाक नाही आणि घरात आई आणि आजीचे रामराज्य, त्यामुळे राजवाडे यांना अडपता दडपता कोणीच नव्हता. त्यामुळे आधीच सुखाचा असलेला त्यांचा बाळपणीचा काळ फारच सुखात गेला. नदीवर पोहावयास जाणे, झाडावर चढणे, गावभर हिंडणे यात त्यांचे लहानपण गेलें. पोहण्याचा, तालीम करण्याचा आणि कुरापती काढण्याचा, मारामाऱ्या करण्याचा षोक फार. मोरोबादादाच्या वाड्यात एक हिरवा हौद होता. त्यात शंभर वेळा उड्या मारून त्यांनी पहिले बक्षीस मिळविले होते. एकदा पर्वतीला जात असताना एक तालीमबाज पोरांचे टोळके भेटले. त्याची

आणि राजवाड्यांची काही बोलाचाली झाली तेव्हा मागचापुढचा काही एक विचार न करता राजवाडे एकटे त्या पोरांवर तुटून पडले. तेवढ्यात पर्वतीवरून परत येणाऱ्या काही लोकांनी ती मारामारी सोडविली. ' दिधले दुःख पराने उसने फेडू नयेचि, सोसावे ' असला गरीबपणा राजवाड्यांच्या रक्तातच नव्हता. त्यांची कोणी खोडी काढली तर खुनशीपणाने तो डूक ते मनात ठेवीत आणि संधी साधून त्याची खोड मोडल्याशिवाय राहत नसत. पुण्याला जोगेश्वरीच्या बोळात भिडे यांच्या वाड्यात राजवाड्यांची बहीण राहात होती. राजवाडे कधीमधी तिच्याकडे राहण्यास जात. या वाड्याच्या मालकाचा गणपती नावाचा एक मोठा व्रात्य मुलगा होता. त्या मुलाने राजवाड्यांचे पाय, त्यांना नकळत ओढून, त्यांना खाली पाडले. ते राजवाड्यांनी लक्षात ठेवले आणि वेळ आली तेव्हा त्या व्रात्य गणपतीचे पाय ओढून त्यांनीही त्याला खाली पाडले. स्वभाव रागीट व फटकळ. आत–बाहेर काही नाही. मनात येईल ते बोलायचे व मनात येईल तसे वागायचे. विकारावर तावा बिलकूल नाही. जेवण मनासारखे झाले नाही, किंचित हेळसांड झाली की तोंडाचा तोफखाना सुरू, मग समोर आई असो की आजी असो की आणखी कोणी असो. थोडा संशय आला किंवा थोडे बिघडले की समोरच्या माणसाला मारायला धावत. अनेक वेळा मोठे बंधू मध्ये पडून ती मारामारी सोडवीत. एकदा संध्याकाळी काळोखात दोघे भाऊ उखळीभोवती घिरट्या घालण्याचा खेळ खेळत होते. खेळता खेळता ती उखळी त्यांच्या भावाच्या पायावर पडली आणि त्याला फार लागले. तेव्हा साहजिकच त्यांच्या आईने त्यांना बेदम मार दिला. तेव्हापासून त्यांचा स्वभाव अतिशय संशयी बनला. खोडसाळपणा तर इतका की, आंधळ्या आजीला घेऊन येताना अर्ध्या वाटेत तिला ते सोडून देत, व लपून बसत आणि मला सोडून देऊ नकोस रे, अशी तिने केविलवाणी आरडाओरड केल्यावर प्रकट होत. [कोणी घोरताना पाहिले की स्वारीला खदखदा हसू येई. इतके की, ते त्यांना आवरत नसे. एकदा तर काय होते ते पाहावे या जिज्ञासेने त्यांनी वाळत घातलेल्या धोत-

राला काडीने आग लावून दिली. सगळी वृत्ती केवळ 'बालोन्मत्त पिशाचवत्' अशी होती. त्यांच्या या वृत्तीला अनुलक्षूनच त्यांची आई व आजी त्यांना 'आग्या वेताळ' असे म्हणत असत. महाभारतात एक श्लोक आहे, 'यथा धेनुसहस्रेषु वत्सो विदति मातरम्। एवं पूर्वकृत कर्म कर्तारमनुगच्छति ॥'–हजारो गाईतून वासरू आपल्या आईला नेमके ओळखते, त्याप्रमाणे पूर्वी केलेले कर्म कर्त्याच्या मागोमाग बरोबर जाते. ज्याप्रमाणे वासरू गाईला ओळखते, त्याप्रमाणे गाय वासराला ओळखते आणि आई मुलाला ओळखते. आई-इतकी मुलाच्या स्वभावाची पारख कोणालाच नसते, राजवाड्यांच्या आईने आपल्या 'वारा प्यायलेल्या वासराचा स्वभाव किती बरोबर ओळखला होता हे तिने राजवाड्यांना दिलेल्या 'आग्या वेताळ' या किताबावरूनच समजते. या श्लोकांचे इतके समर्पक उदाहरण दुसरीकडे सापडणे फार कठीण आहे.

परंतु मोठ्या खेदाची गोष्ट म्हटली पाहिजे की, आईला ज्याप्रमाणे मुलाची ओळख पटली त्याप्रमाणे मुलाला आईची ओळख काही शेवट-पर्यंत पटू शकली नाही. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' हे शंकराचार्यांचे प्रसिद्ध वचन 'कुपुत्र' म्हणून राजवाडे यांच्या वर्तनास लावण्याचे खरोखर जिवावर येते. पण ते खरे असल्यामुळे नाइलाज आहे. त्यांची आई बिचारी त्यांच्यासाठी जीव टाकी, पण हे मात्र, लहानपणी नेणते असताना काय किंवा मोठेपणे जाणते झाल्यावर काय तिला हिंग लावून म्हणून विचारीत नसत. एकदा ते कोठे लांबच्या प्रवासाला गेले आणि तेथून आईला त्यांनी तार केली की, 'मी मरतो आहे, मला पैसे पाठवा.' त्यांच्या आईने जवळचे किडुकमिडुक होते ते सगळे विकले आणि पंधरा रुपये उभे केले व त्यांना तातडीने पाठवून दिले. १८८७ पासून १८९६ पर्यंत त्यांचे बंधू कराचीस होते तेव्हा राजवाडे यांची आई त्यांच्या जवळच राहत होती. या काळात राजवाडे यांनी आईला कंगाल केले व तिची उपासमार केली. १८९२ च्या सुमारास त्यांनी एक क्लास चालवला होता. त्याचे महिन्याला त्यांना तीस–पस्तीस रुपये मिळत. एवढे पैसे त्या काळात खूप होते.

आणि मनात असते तर राजवाड्यांना आईला अगदी फुलासारखे सुखात ठेवता आले असते. पण तो विचार त्यांच्या मनात चुकून काही आला नाही.

हाती आलेला सगळा पैसा ते खुशाल उडवून टाकीत आणि आईच्या हाती छदाम म्हणून लागू देत नसत. आपल्या लाडक्या मुलाचे हे वर्तन पाहून त्या विचारीचे डोके फिरले. तेव्हा राजवाडे यांचे बंधू मुंबईला विल्सन कॉलेजात होते, त्यांच्याकडे तिला सरळ पोचवून दिले. तिच्याजवळ ते कधी बसले नाहीत की तिची त्यांनी कधी विचारपूसही केली नाही. मुंबईची हवा तिला मानवली नाही. तिचे डोके आणखीनच फिरले. अशा वेडाच्या स्थितीतच १९०० साली ती मृत्यू पावली आणि मुलाच्या तावडीतून एकदाची सुटली.

'यावज्जीही काय मी न कळले आप्ताप्रति नीटसे !' मित्रांतेही कळे न गूढ न कळे माझे मलाही तसे ! असे गडकऱ्यांनी म्हटले आहे. गडकऱ्यांच्या या ओळी राजवाड्यांना फार लागू पडतात. शेवटपर्यंत त्यांचा स्वभाव म्हणजे एक चमत्कारिक गूढ होते. ते त्यांच्या मित्रांनाही कधी उलगडले नाही आणि त्यांचे त्यांना तरी ते उलगडले असेल की नाही याची शंकाच आहे. राजवाडे हे जात्या दुष्ट नव्हते. त्यांच्या ठिकाणी प्रेमळपणा व अनुकंपा उदंड होती. पण ती केव्हा, कोठे व कशामुळे जागी होईल याचा काही नेम नव्हता. ते लहान असताना एकदा एक भिकारीण भीक मागण्यासाठी आली व दाराशी उभी राहून मोठमोठ्याने ओरडू लागली. तावडतोब राज–वाडे यांनी कसलाही विचार न करता अंगावर दुलई होती तीच तिला देऊन टाकली. भिड्यांच्या वाड्यात ते जात असत तेथे अवू नावाचे एक म्हातारे गृहस्थ राहत होते त्यांच्या शेवटच्या आजारात राज–वाडे यांनी त्यांची शुश्रूषा इतकी जीव लावून केली की जवळपासचे लोकसुद्धा चकित झाले, जो ना नात्याचा ना गोत्याचा त्या या अवूला राजवाडे यांनी जीव लावावा, आणि जी जन्मदाती आई तिच्या प्रेमाची परतफेड 'हे काय फल मम तपाला' असे तिला वाटावे, इतक्या निर्घृणपणाने करावी, भिकारणीला आईसारखे वागवावे आणि

आईला भिकारणीसारखे वागवावे या वर्तनाचा ग्रंथ लागणे दुरापास्त आहे. राजवाड्यांचे त्यांच्या आईशी वर्तन म्हणजे त्यांच्या जीवनातले न सुटणारे एक दुर्दैवी कोडे आहे.

अशा या मुळात मनस्वी आणि स्वच्छंदी असलेल्या स्वभावाला, आकार देण्यास राजवाडे यांना मिळालेले शिक्षण सर्वस्वी असमर्थ ठरले यात नवल नाही. १८७१ पासून १८९१ पर्यंत शाळा व कॉलेजात मिळून वीस वर्षे त्यांनी घालविली आणि अखेर या खटाटोपातून 'काहीच वेचिले नाही शेवटी हात झाडिले ' असे रामदासांप्रमाणे म्हणण्याची त्यांच्यावर वेळ आली. पण, राजवाडे यांच्या मनाप्रमाणे शिक्षणातून प्राप्त झालेल्या या ' शून्यलब्धी ' च्या फलश्रुतीला ते स्वतः जबाबदार नव्हते तर त्यांच्या वेळी असलेली शिक्षणपद्धती जबाबदार होती. शिक्षण संपल्यानंतर दहा-बारा वर्षांनंतर ' कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळातील स्वानुभव ' म्हणून त्यांनी एक प्रदीर्घ लेख लिहिला. त्यात शिक्षणातल्या वदतो व्याघातांची त्यांनी मूलग्राही मीमांसा केली आहे आणि कमीजास्त प्रमाणात आजही ती अबाधित राहावी, इतके तिचे महत्त्व आहे.

आठव्या वर्षी राजवाडे यांनी धुळाक्षरे शिकण्यास आरंभ केला आणि पुढे तीन वर्षे मराठी चवथीपर्यंत त्यांचे शिक्षण दोन-चार खेडेगावातील व शहरातील शाळांत मिळून झाले. या तीन वर्षात थोडेफार मराठी व गणित यांच्यापलिकडे भूगोल, इतिहास, व्याकरण, व्युत्पत्ती, काव्य या विषयांचे कसलेही ज्ञान त्यांना झाले नाही. तीन वर्षांतील फक्त दीड वर्ष ते शाळेत गेले. बाकीची वर्षे धांगडधिंग्यात, विटीदांडूत, पोहण्यात, उडया मारण्यात आणि मारामाऱ्या करण्यात गेली ' तेवढया अवधीत मला एकही पंतोजी शास्त्रीय रीत्या शिक्षण देणारा भेटला नाही. येथून तेथून सर्व पंतोजी आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे उचलून टाकणाऱ्यांपैकी होते.' असल्या या मराठी शाळेतून सुदैवाने चौथ्या इयत्तेनंतर राजवाड्यांची सुटका झाली आणि घरच्या मंडळींनी त्यांना बाबा गोखले यांच्या इंग्रजी

शाळेत घातले.

एके काळी बाबांच्या शाळेचे नाव बरे होते. पण अलिकडे ती कीर्ती बरीच खालावली होती. कारण, बाबांचे लक्ष शाळेवरून उडून वकिलीकडे लागले होते. त्यामुळे शाळा आपली रे रे करीत कशी-बशी चालली होती इतकेच. 'मास्तरांना इतर धंदे करता यावेत म्हणून शाळा सकाळी सहा वाजल्यापासून दहा वाजेपर्यंत भरत असे. शाळेत तीन-चारशे मुले होती पण त्यांची बसण्याची व्यवस्था अगदी भिकार होती.' राजवाड्यांची स्थापना ज्या वर्गात केली होती, तो ओलसर, दमट, अंधुक, घाणेरडा होता. वर्गात इंग्रजी मातृकांपासून हॉवर्डच्या दुसऱ्या पुस्तकापर्यंत शिकणाऱ्या मुलांच्या चार तुकड्या आणि पन्नास-साठ मुले होती व त्यांना शिकवणारा एकच मास्तर होता. 'त्यामुळे प्रत्येक तासातील चार-पाच मिनिटे माझ्या तुक-डीच्या वाट्यास व त्यांपैकी अर्धे मिनिट माझ्या वाट्यास येई, सहा-पासून दहापर्यंतच्या चार तासातील पाच विषय मिळून माझ्या वाट्यास मास्तरच्या वाणीचा स्पर्श दोन-अडीच मिनिटे येई. तेव-ढ्यात जे काही ज्ञान संपादन करता येईल तेवढे करण्यात मी पाच-सात महिने लोटले ! तेवढ्यात बाबांच्या शाळेतील त्यांच्यासारखेच वकील आणि फावल्या वेळी मास्तर असलेले काशिनाथपंत नातू यांनी बाबांच्या शाळेतले काही मास्तर व मुले फितवून नवी शाळा काढली. त्या शाळेत राजवाड्यांच्या वर्गातील काही पुढारी मुले गेली म्हणून राजवाडेही गेले. येथे त्यांना दुसऱ्या इयत्तेत बसविण्यात आले. तीन-चार महिने गेले आणि वामनराव भावे व इंदापूरकर यांनी नवी शाळा काढली व त्या शाळेत नातूंच्या शाळेतली काही मुले फितवून नेली. त्या मुलांबरोबर राजवाडेही भाव्यांच्या शाळेत दाखल झाले आणि त्याबद्दल त्यांना तिसऱ्या इयत्तेत बढती मिळाली. भाव्यांच्या शाळेत तीन वर्षे काढून १८८० त सातव्या इयत्तेत राजवाडे जातात, तो इंदापूरकर व गोखले हे मास्तर शाळा सोडून मिशन स्कूलमध्ये गेले. शिकवणारा कोणीच नसल्यामुळे राजवाडे यांनी भाव्यांची शाळा सोडली व रेव्हरंड बोमंटच्या मिशनस्कूलात ते गेले.

दोन-तीन महिन्यांनी तीही शाळा सोडून स्वस्थ घरी बसले आणि एक वर्षाने विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या शाळेत दहा-पंधरा दिवस जाऊन, प्रवेश परीक्षेचा घरीच अभ्यास करून १८८२ च्या जानेवारीत ती परीक्षा ते खाजगी रीतीने पास झाले.

अशा प्रकारे सहा वर्षांत पाच खासगी शाळांचा अनुभव राजवाडे यांनी घेतला. त्या अनुभवाचा निष्कर्ष एवढाच की, 'ज्यांनी शाळा काढल्या, त्यांच्यापैकी बहुतेकांची शाळा काढण्याच्या दृष्टीने चारित्र्य आणि विद्वत्ता या दृष्टीने पात्रता शून्य होती ! शाळा काढण्यात क्षुद्र मत्सर व उदरपूर्तीचा तात्पुरता उपाय. ह्याखेरीज (काशिनाथपंत नातू) ह्या नीच मनोवृत्तीच्या व त्याहून नीच नीतिमत्तेच्या इसमाचा काही जास्त हेतु नव्हता. (शाळा चालविण्यास) उदरपूर्तीचा धंदा पत्करण्यापलीकडे बावा गोखले यांचा काही इतर हेतू होता, असे दिसत नाही. गुरुजीच्या पेशाला अवश्य लागणारी जी कडकडीत नीतिमत्ता तिचा बावांच्या ठायी पूर्ण अभाव होता, हे पुण्यातील आबालवृद्धांस मशहूर होते. सीतारामपंत चिपळोणकरादि बाबांचे सहाय्यकारी लोक सुरादेवीचे कट्टे उपासक म्हणून प्रसिद्ध होते. अशा लोकांच्या हाती दहा-पाच वर्षांत शाळेचे बारा न वाजते तर मोठेच आश्चर्य घडले असते ! व्यवसायाशी निष्ठा व नीतिमत्ता या दृष्टीने भावे आणि इंदापूरकर वरेच श्रेष्ठ होते. बाकी सरकारी आणि खासगी हायस्कूले संस्कारकेन्द्रे म्हणून सारख्याच किंमतीची होती. खासगी शाळांतून जसे कित्येक अनीतिमान मास्तर असत, तसेच हायस्कुलातही अपेयपान, अभक्ष्यभक्षण, चार्गटपणा, वाहेरख्यालीपणा वगैरे दुर्गुणांनी मंडित असे गुरुजी थोडेफार होते. अशा स्थितीत नीतिमत्तेचा धडा मुलांच्या मनावर ठसविण्याचे काम सरकारी व खासगी शाळांतील मास्तरांच्या हातून फारच गचाळपणाने यत्किंचितही साधले न जावे हे साहजिकच आहे.' या सर्वदूर दुरवस्थेला एकच अपवाद होता तो म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर होय.

१८८२ च्या जानेवारीत राजवाडे कॉलेजात पुढील शिक्षणासाठी गेले आणि १८९१ च्या जानेवारीत बी. ए. झाले. सामान्य माणसाला

बी. ए. व्हायला चार वर्षे लागली असती. राजवाडे मॅट्रिकपासून बी. ए. पर्यंत एकदाही नापास झाले नव्हते. पण त्यांना बी. ए. होण्याला मात्र सामान्य विद्यार्थ्यापेक्षा दुप्पट काळ लागला. या विलंबाला काही प्रमाणात सुरुवातीला त्यांची आर्थिक दुरवस्था जबाबदार होती. १८८२ च्या जानेवारीत मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजात त्यांनी पहिली टर्म भरली. पण पैशाच्या व इतर कारणामुळे दुसऱ्या टर्मला ते कॉलेजात गेले नाहीत; व पुढली दोन वर्षे म्हणजे १८८२ ते १८८४ त्यांनी पोटासाठी एक जुजबी धंदा काढला. तो म्हणजे पब्लिक सर्व्हिस सेकंड ग्रेड परीक्षेकरिता उमेदवार तयार करण्याचा वर्ग होय. या वर्गात दीड दोन तासांच्या वटवटीने महिना तीस पस्तीस रुपये प्राप्ती दरमहा होई. १८८४ मध्ये त्यांच्या वडील बंधूंना डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळाल्यामुळे त्या वर्षीच्या जूनपासून डेक्कन कॉलेजात ते पी. ई. दुसरी टर्म भरू लागले आणि ती परीक्षा ते पासही झाले. १८८५ साली दोनही टर्म भरून ते परीक्षेला गेले नाहीत. १८८६ व १८८७ दोन्ही वर्षात ते कॉलेजात राहत होते. १८८७ च्या शेवटी परीक्षा न देताच ते कॉलेज सोडून गेले. मग १८८८ साली बाहेरचा विद्यार्थी म्हणून फर्स्ट बी. ए. च्या परीक्षेला ते एकदम गेले व पास झाले. पुढे वर्षभर १८८९ साली भाव्यांच्या शाळेत ते वनस्पतीशास्त्र शिकवीत होते. १८९० साली ते डेक्कन कॉलेजात राहण्यास गेले व महिनाभर अभ्यास करून १८९१ च्या जानेवारीत दुसऱ्या बी. ए. ची परीक्षा इतिहास हा ऐच्छिक विषय घेऊन पास झाले.

राजवाडे यांच्या या दीर्घसूत्री आणि खंडित शिक्षणाचे कारण म्हणजे त्यांच्या वेळी प्रचलित असलेल्या परीक्षापद्धतीशी त्यांचा प्रामाणिक मतभेद होता हे होय. पी. ई. नंतर बी. ए. पर्यंत तीन वर्षात मिळून दरवर्षी सहामाही, उपान्त्य आणि वार्षिक मिळून नऊ परीक्षा होत होत्या. या परीक्षांना लावलेली पुस्तके म्हणजे इंग्रजी कविता, संस्कृत नाटके, निबंध, तर्कसंग्रह, बेकनचे ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग ही सारी राजवाड्यांच्या मते दरिद्री आणि कालबाह्य झालेली होती. परीक्षेकरिता ती तीन तीन वेळा घोकायची व पुढे जास्त ज्ञान

झाल्यावर विसरायची हा साराच प्रकार राजवाड्यांना विचित्र वाटे. ते म्हणतात, ' प्रत्येक वेळेस तीच ती क्षुल्लक व दरिद्री पुस्तके तोंडपाठ करून नीट ध्यानात ठेविली पाहिजेत. तशात बी. ए. पर्यंत शिकविल्या जाणाऱ्या पुस्तकांतून बरीच पुस्तके अशी आहेत की, जी अथपासून इतिपर्यंत ध्यानात ठेवण्यात अर्थ नाही. ही खुळसट माहिती तीनतीनदा परीक्षा देण्याकरिता सूक्ष्मपणे ध्यानात ठेवायला लावणे म्हणजे विद्यार्थ्यांना व्यर्थ शीण देणे आहे. एकच परीक्षा तीन तीन वेळा देण्याची ही अजब सरकारी पद्धती मला बिलकूल पसंत नव्हती. त्याचकरिता सहामाही, प्रिलिमिनरी वगैरे परीक्षांस मी बसत नसे. अर्थात दोन-तीन वर्षे मला कोणत्याच परीक्षेला जाता आले नाही. १८८४ साली प्रथम मी डेक्कन कॉलेजला गेलो. त्या वेळी दर दोन महिन्यांनी एक एक परीक्षा जर घेतली असती तर ह्या तिन्ही परीक्षा पहिल्या सहामाहीतच मी पास झालो असतो. परंतु सहा टर्म, सहामाही व उपान्त्य परीक्षा आणि मुंबईच्या फेऱ्या अशा नाना प्रकारच्या खुळांत सापडल्यामुळे, १८८४ पासून १८९० पर्यंत मला व्यर्थ रखडत रहावे लागले. ह्या रखडण्यात इतके मात्र झाले की, माझ्या मनाला जे योग्य वाटले तेच मी केले आणि कॉलेजातील खुळचट शिस्तीला वळी न पडता आणि मन व मेंदू यांना शैथिल्य व शीण न येऊ देता जगात जास्त उत्साहाने काम करण्यास मी सिद्ध झालो.

मुंबईला विल्सन आणि पुण्याला डेक्कन अशा दोन कॉलेजात कमी - जास्त मिळून नऊ वर्षे राजवाड्यांनी काढली. राजवाडे तसे मोठे परखड निरीक्षक होते. ते निरनिराळ्या प्रोफेसरांच्या वर्गांत शिकण्यापेक्षा प्रोफेसर शिकवतो कसा हेच पाहण्यासाठी जाऊन बसत. पहिल्या वर्षी वर्गातील दहा–पाच व्याख्यानांना ते हजर होते आणि १८८४ ते १८८८ या चार वर्षांत मिळून दहा–वीस वेळा ते वर्गात उपस्थित होते. एवढ्या अवधीत विल्सन कॉलेजातील मॅकमिलन व हॅथॉर्नवेट आणि डेक्कन कॉलेजातील भांडारकर व सेल्बी हे सोडले तर बाकी कोणत्याही प्रोफेसराबद्दल राजवाड्यांना आदर वाटला नाही. हॅथॉर्नवेट आणि मॅकमिलन म्हणजे तरी काय, बरे होते म्हणजे

वाईट नव्हते इतकेच. त्यांचा मुख्य गुण म्हणजे वर्गात वेळेवर येणे आणि मन लावून शिकविणे, बाकी ते शिकविणे म्हणजे मोठे नामांकित होते असे नाही. मॅकमिलन तर्कशास्त्रातील सोपी माहिती अडखळत अडखळत नीट करून सांगे. सेल्बीचा मोठा गुण हाच होता की तो रोजचे धडे काळजीने घरी पाहून येऊन त्यांची परीक्षेपुरती संक्षिप्त टाचणे विद्यार्थ्यांना उतरून देई. त्याने तो शिकवत असलेल्या पुस्तकांवर विद्यार्थ्यांकरिता परीक्षोपयोगी टीपा छापून काढल्या होत्या. असल्या पुस्तकात मार्मिक विवेचनाची किंवा सखोल पंडित्याची अपेक्षा करेल तो फसेल. 'तथापि इतर असल्याच कॉलेजातील शिक्षक आपापल्या विषयावरील ग्रंथासंबंधाने एक ओळही छापून काढण्याचे धैर्य करीत नाहीत. त्यापेक्षा मि. सेल्बी यांचा टाचणेच छापून काढण्याचा क्रम का होईना बराच प्रशंसनीय आहे.' भांडारकर मात्र खरे प्रोफेसर. हौ, बुल्हर, कीलहॉर्न इत्यादी जर्मन पंडितांच्या तोडीची प्राचीन लेख, संशोधनाची ऐपत त्यांच्या ठायी होती. आणि त्यांच्यापेक्षा संस्कृत सारस्वतात आणि तर्क, न्यायवेदान्तादि शास्त्रांत त्यांची गती विशेष होती. त्यांची चिकित्सक व विवेचक बुद्धीही वरच्या दर्जाची होती. पण विद्यार्थ्यांना परीक्षेपुरते शिकवायचे असल्यामुळे आणि तेही भाषांतर पद्धतीने असल्यामुळे भांडारकरांचे पांडित्य विद्यार्थ्यांच्या दृष्टीने असून नसल्यातच जमा होते.

त्यातल्या त्यात बरे म्हणण्यासारखे हे प्रोफेसर सोडले, म्हणजे बाकीची मंडळी म्हणजे एकापेक्षा एक नग होती. ऑलिव्हर नावाचा प्रोफेसर इतका लाजाळू होता, की मुलांनी वर्गात कितीही गोंधळ घातला तरी पायाच्या नखाकडे वळविलेली मान वर करून पोरांकडे पाहायची त्याची छाती म्हणून होत नसे. पियर्सन संस्कृत शिकवी पण संस्कृतपेक्षा संस्कृतचे इंग्रजी भाषांतर करण्यात तो पटाईत होता. बॅरेट इंग्रजी कादंबरी शिकवी म्हणजे शब्दाचे अर्थ सांगे. ऑक्स्नहॅमचे शिकविणे म्हणजे वर्गात पंधरा मिनिटे उशीरा यावे व पंधरा मिनिटे आधी जावे. आणि पुस्तकांची पाने चाळीत मध्येच दहा-पाच ओळी वाचाव्या व थट्टामस्करी करून विद्यार्थ्यांना खूष करून सोडावे. कर-

करे यांची कागदोपत्री गुणवत्ता उत्तम होती. ते केम्ब्रिजचे मीनियर ऑप्टिम झाले होते पण जरी ते काम बिनबोभाट करीत तरी त्यांच्या शिकवण्यातून एकही गाढा गणितज्ञ निपजला नाही. तेच अपयश भांडारकरांचे होते. त्यांच्यासारखा पंडित ते निर्माण करू शकले नाहीत. पण हा दोष एखाद दुसऱ्या व्यक्तीचा नसून, जिचे विल्सन किंवा डेक्कन कॉलेज हे एक अंग होते, त्या परकीय सरकारने सुरू केलेल्या कनिष्ठ, मध्यम व उच्च शिक्षण पद्धतीचा होता. सरकारी नोकरीकरिता परीक्षा घेऊन विद्यार्थी तयार करणे हे तिचे ध्येय होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ठायी विवेकबुद्धी, बहुश्रुतपणा किंवा शास्त्र प्रवणता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे मुदलातच तिच्या उद्दिष्टात बसत नव्हते. गुलामांना स्वतंत्र नागरिकांचे शिक्षण कोठे दिले आहे ? त्याचमुळे विषयांचा व्यासंग आणि विषय शिकविण्याची क्षमता या दोन्ही दृष्टींनी ज्यांची पात्रता अगदी सुमार होती, अशा वशिल्याच्या तट्टांची या प्रोफेसरच्या जागेवर वर्णी लागली होती. अशा खोट्या प्रोफेसरांची वेन नावाच्या खऱ्या म्हणजेच विद्वान प्रोफेसरने एकदा व्याख्या केली होती, ' A Professor is one who proffeses to know what he does not know ' खरोखरीच जे आपणास काही येत नसते ते येत आहे अशा घमेंडीने दर्शविणारा तो प्रोफेसर. राजवाडे यांच्या नशिबी आलेले बरेचसे प्रोफेसर असल्याच जातीचे होते.

एकंदर शिक्षणपद्धतीतच जो बौद्धिक अप्रामाणिकपणा ओतप्रोत भरलेला होता, त्यामुळे राजवाडे यांना त्या शिक्षणपद्धतीचेच एक प्रतीक असलेल्या डेक्कन कॉलेजबद्दल काडीचेही प्रेम राहिले नाही. मोठमोठे युरोपियन व एतद्देशीय पुढारी, आणि युनिव्हर्सिटीचे चॅन्सेलर वगैरे लोक वार्षिक पदवीदान समारंभाचे वेळी विद्यार्थ्यांना कंठरवाने उपदेश करीत की विद्या करून नोकरी मिळवणे हा मोक्ष नव्हे, विद्या केवळ ज्ञानार्जनाकरिता शिकायची आणि डेक्कन कॉलेज व त्यातले शिक्षक प्रत्यक्षात काय करीत असत तर नोकरी. बारा आणि बारा वर्षे शिक्षण द्यावयाचे नोकरीचे आणि युनिव्हर्सिटीच्या पदवी-

दान समारंभाच्या वेळी परीक्षा पास झालेल्या सेवार्थी उमेदवारांना उपदेश करायचा स्वतंत्र धंदा करण्याचा किंवा सरस्वतीच्या एकान्त उपासनेचा, ह्या मानभावीपणाचा मला बहुत तिटकारा आला आणि नोकर तयार करणाऱ्या डेक्कन कॉलेजबद्दल आणि त्यातील शिक्षकांबद्दल माझ्या मनात तिरस्कार उत्पन्न झाला. ज्ञानोपासनेच्या या उपदेशाचा परिणाम राजवाड्यांवर मात्र फार झाला, आणि विष्णुशास्त्र्यांनी सरकारी नोकरी म्हणजे गुलामगिरी आहे असे जे प्रतिपादन केले होते व त्याप्रमाणे आचरणही केले होते, त्यामुळे सरकारी नोकरी म्हणून करावयाची नाही असा त्यांनी पक्का निश्चय केला होता, ' केवळ विद्यार्जन करण्याचा हेतू बाळगणारा मी, नोकर तयार करण्याच्या गिरणीत जाऊन पडलो! ' अर्थात शिक्षकांशी व विद्यार्थ्यांशी त्यांचे गोत्र जमले नाही यात नवल नाही. कारण, शिक्षक हे 'शिक्षक' नव्हते आणि विद्यार्थी हे ' विद्यार्थी ' नव्हते. ते सरकारी नोकरीसाठी उमेदवार होऊ पाहणारे परीक्षार्थी होते. ज्यामुळे कॉलेजात असताना विजापूरकर, रावजी श्रीधर भिडे यांच्यासारखे चारदोन लोक सोडता राजवाडे यांना कोणी ' समानशीले व्यसनेषुसख्य ' असा मित्र मिळू नये हे साहजिकच म्हटले पाहिजे.

डेक्कन कॉलेजबद्दल राजवाडे यांना जी ही अप्रीति होती, तिच्यात त्या कॉलेजच्या भौगोलिक पार्श्वभूमीने जास्त भर घातली होती. ' ज्या स्थळावर डेक्कन कॉलेज बांधलेले आहे त्या स्थळाचे माहात्म्यच असे आहे की, त्या स्थळी येणाऱ्या प्रत्येक मराठ्याला एक प्रकारचे औदासिन्यच प्राप्त व्हावे ! १८१७ त मराठ्यांचे राज्य जाण्याच्या सुमारास खडकीची जी लढाई झाली म्हणून म्हणतात ती ह्याच स्थळी झाली. होळकरांचा पूल, खंडोबाचा माळ व पलीकडील टेकाड, ही ह्या लढाईची मुख्य स्थळे होत. कॉलेजभोवताली माळावर अद्यापी मनुष्याची हाडे कधीमधी सापडतात म्हणून म्हणतात. ह्या ठिकाणी मराठ्यांचा मोड झाला आणि मराठी राष्ट्राचा अंत झाला ! अशा ह्या अपशकुनी जागेवर बांधलेल्या इमारतीत कोण्या मराठ्याचे मन रमेल ? तशात ह्या इमारतीतही काही गोंडसपणा किंवा मराठपणा

होता असेही नाही. डेक्कन कॉलेजचे ते कलंडलेले शिखर व त्यावरील पऱ्याची थापटलेली टोपी, पहिल्यांदा जेव्हा १८८४ त मी कॉलेजात आलो तेव्हा पाहून एक तासभर खदखदा हसलो. भोवताली तो रखरखीत व ओसाड माळ पाहिला म्हणजे तर माझे मन फारच खट्टू होत असे. डेक्कन कॉलेजशेजारील एक नदी काय ती मला रम्य वाटे. बाकी तेथील सर्व वास्तू माझ्या मराठी डोळ्यांना विषाद देत.'

मराठी राज्याच्या स्मशानभूमीवर बांधल्या गेलेल्या डेक्कन कॉलेजबद्दल ही विषादाची भावना फक्त राजवाड्यांचीच होती असे नाही. त्यांच्या वेळी डेक्कन कॉलेजात काळकर्ते शिवरामपंत परांजपे होते, ह्या पूर्वस्मृतींनी तेही नेहमी उदास दिसत. ती त्यांची भावना शेवटपर्यंत कायम होती. मरणापूर्वी एक वर्ष त्यांनी ' मराठ्यांच्या लढायांचा इतिहास ' म्हणून ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात ' खडकीची लढाई ' या प्रकरणात या मैदानाचे वर्णन करताना ते म्हणतात, ' हे मैदान फार मोठे आहे व त्या मैदानातील एखाद्या उंच ठिकाणी उभे राहून हे ते त्या खडकीच्या लढाईचे रणक्षेत्र अशा दृष्टीने त्याच्याकडे पाहिले म्हणजे आपल्या मनामध्ये काय भावना उचंबळतात याचे वर्णन करणे शक्य नाही. त्या भावनांचा ज्यांना अनुभव घ्यावयाचा असेल, त्यांनी त्या मैदानावर समक्ष जाऊनच त्या स्थळाचे आपल्या अश्रुपूर्ण नेत्रांनी निरीक्षण केले पाहिजे. फार कशाला डेक्कन कॉलेजात बेन म्हणून इतिहासाचा प्रसिद्ध आणि नामांकित प्रोफेसर होऊन गेला. तो इंग्रज नव्हता. स्कॉटिश होता. त्याला हिंदुस्थानबद्दल व हिंदूंच्या चालीरीतीबद्दल मोठा आदर वाटे. या देशातील हवापाण्याला धोतर अंगरख्यासारखा पोषाख किती योग्य आहे हे तो मोठ्या कौतुकाने सांगे. मला करता आला असता तर मी येथे असाच पोषाख केला असता असे सांगे. प्रत्येक हिंदु विद्यार्थ्याने टोपी घालून वावरले पाहिजे असा त्याचा कटाक्ष होता. एकदा एक नखशिखांत साहेबी पोषाख केलेला विद्यार्थी वर्गात बोडकाच आला व बसला, तेव्हा तू हिंदू आहेस की ख्रिस्ती आहेस असे बेनने त्याला विचारले व तो हिंदू आहे असे कळल्यावर त्याला टोपी घालायला लावली. शिवाजी